# ‘नियमीत प्रसिध्दी पत्रक’
# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद.

शनिवार, दि.१७/१०/२०२०
वेळ: २०.१५

## “मोटार वाहन कायदा अंतर्गत ९४ कारवाया- १७,२०० ₹ ‘तडजोड शुल्क प्राप्त.”

उस्मानाबाद जिल्ह्यातील महत्वाच्या रस्त्यांवर दि. १६.१०.२०२० रोजी १८ पोलीस ठाणी व उस्मानाबाद शहर वाहतुक शाखा यांनी मोटार वाहन कायदा अंतर्गत ९४ कारवाया करुन १७,२०० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल केले आहे.

## “अवैध मद्य विरोधी कारवाई.”

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रा.):** सुनिल कल्याणराव देशमुख, रा. येडशी, ता. उस्मानाबाद हा दि. १६.१०.२०२० रोजी जुने रेल्वे स्थानकाजवळ घागरी मध्ये १५ लि. गावठी दारु (किं.अं. ९५०/-रु.) विनापरवाना बाळगला असतांना पो.ठा. उस्मानाबाद (ग्रा.) यांच्या पथकास आढळला.

**पोलीस ठाणे, वाशी:** लता विलास काळे, रा. सरमकुंडी फाटा, ता. वाशी या दि. १६.१०.२०२० रोजी स्वत:च्या राहत्या शेडसमोर १० लि. गावठी दारु (किं.अं. ९००/-रु.) विनापरवाना बाळगल्या असतांना पो.ठा. वाशी यांच्या पथकास आढळल्या.

**यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद आरोपींविरुध्द म.दा.का. अंतर्गत संबंधीत पो.ठा. येथे गुन्हे नोंदवले आहेत.**

## “महावितरण कार्यालयात गोंधळ- तोडफोड करणाऱ्यांवर गुन्हा दाखल.”

**पोलीस ठाणे, परंडा:** महावितरण कनिष्ठ अभियंता- १)सुरज नायर २) शेखरसिंग राजपुत हे दोघे दि. १६.१०.२०२० रोजी १५.३० वा. परंडा येथील महावितरण उपविभागीय कार्यालयात कर्तव्यावर होते. यावेळी १)राहुल चंद्रकांत डोके २)राहुल गाढवे ३)मोतीराम वडार ४)तात्या पाटील, सर्व रा. कंडारी, ता. परंडा यांनी कार्यालयात येउन कंडारी शेतातील चालु करण्याच्या कारणावरुन हुज्जत- गोंधळ घालून अपशब्द वापरून महावितरण कार्यालयातील कॅबीनच्या काचा फोडल्या. यात शेखरसिंग राजपुत यांना काच लागल्याने ते जखमी झाले. यावर सुरज नायर हे नमूद चौघांना समजावून सांगत असतांना त्यांनी सुरज नायर यांनाही धक्काबुक्की करुन शिवीगाळ केली. अशा प्रकारे त्या चौघांनी लोकसेवकाच्या कर्तव्यात जाणीवपुर्वक अडथळा निर्माण करुन शासकीय मालमत्तेचे नुकसान केले. यावरुन सुरज नायर यांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३५३, ३३२, ४२७, ३४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “चोरी.”

**पोलीस ठाणे, लोहारा:** श्रीकांत कुंडलीक देशमुख, रा. बेंडकाळ, ता. लोहारा यांनी स्वत:ची होंडा ड्रिम युगा मो.वा. एम.एच. २५ एबी ७९१७ ही दि. १३.१०.२०२० रोजी आपल्या राहत्या घरासमोर लावली होती. ती

मध्यरारात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने चोरुन नेली आहे. अशा मजकुराच्या श्रीकांत देशमुख यांनी दि. १६.१०.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**"खुन."**

**पोलीस ठाणे, ढोकी:** सलिम हशमोद्दीन शेख, वय ४९ वर्षे, रा. टाकळी (ढोकी), ता. उस्मानाबाद हे दि. १६.१०.२०२० रोजी ०९.०० वा. सु. भंडारवाडी येथील तेरणा नदीवर मासे पकडण्यासाठी गेले होते. यावेळी १) मुन्ना रावसाहेब अंधारे २) गोविंद चंदु एडके, दोघे रा. भंडारवाडी, ता. उस्मानाबाद यानी मासेमारीच्या कारणावरुन सलिम शेख यांना लाथाबुक्क्यांनी, काठीने मारहाण केल्याने मुकामार लागुन ते मयत झाले. अशा मजकुराच्या मोहसीन सलीम शेख (मयताचा मुलगा) यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३०२, ३४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**"अपघात."**

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** चा चालक- विठ्ठल निळकंट पुरी, रा. कवठा यांनी सुझूकी ८०० कार क्र. एम.एच. २४ व्ही ६६२४ ही दि. १३.१०.२०२० रोजी १५.०० वा.सु. तुळजापूर- काक्रंबा पर्यायीमार्गावरील चौकात निष्काळजीपणे चालवून विजेंद्र विश्वनाथ घाडगे व सुरेखा रघुनाथ सावंत, रा. रुईभर, ता. उस्मानाबाद हे प्रवास करत असलेल्या स्कुटरवरला धडक दिली. या अपघातात सुरेखा सावंत व विजेंद्र घाडगे हे दोघे गंभीर जखमी झाले तर नमूद सुझूकी कार मधील प्रवाशी किरकोळ जखमी झाले व स्कुटरचे आर्थिक नुकसान झाले. अशा मजकुराच्या सुरेखा सावंत यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या लेखी निवेदनावरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३३७, ३३८ आणि मो.वा.का. कलम- १८४ अन्वये गुन्हा दि. १६.१०.२०२० रोजी नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, तामलवाडी:** चालक- ओमप्रकाश शामलाल राजीर, रा. आत्मज, राज्य- उत्तरप्रदेश याने ट्रक क्र. जी.जे. ०१ एफटी ८०१४ हा दि. १६.१०.२०२० रोजी ०५.०० वा. सु. तामलवाडी शिवारातील शाकंभरी हॉटेलसमोरील रस्त्यावर निष्काळजीपणे चालवून रस्त्याच्या बाजूस असलेल्या ट्रक क्र. एम.एच. २४ एबी ८३५८ ला धडक दिली. या अपघातात ट्रक क्र. एम.एच. २४ एबी ८३५८ चा सहायक- खंडू रघुनाथ सुरवसे हा जखमी झाला असुन ट्रकचे आर्थिक नुकसान झाले आहे. अशा मजकुराच्या ट्रक चालक- महेशराज कांबळे, रा. टाका, ता. औसा यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३३७, ४२७ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, उमरगा:** विक्रम उत्तम कटके, रा. गौतमनगर, उमरगा हे दि. १४.१०.२०२० रोजी १९.०० वा. सु. उमरगा येथील रस्त्याने पायी चालत जात होते. यावेळी महादेव चव्हाण याने मो.सा. क्र. एम.एच. २५ एएम ९०५३ ही निष्काळजीपणे चालवून विक्रम कटके यांना धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले. अशा मजकुराच्या विक्रम कटके यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या लेखी निवेदनावरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३३७, ३३८ सह मो.वा.का. कलम- १८४ अन्वये गुन्हा दि. १६.१०.२०२० रोजी नोंदवला आहे.

## “अतिक्रमण करणाऱ्यावर गुन्हा दाखल.”

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (श.):** मल्हारी रावसाहेब ओमसे, रा. यशवंतनगर, उस्मानाबाद यांच्या वडगांव (सि.) सर्वे क्र. ४१५ मधील शेतावर कब्जा करण्याच्या उद्देशाने १) नाना अंबादास जानराव २) साधु भागवत जानराव ३) भागवत अंबादास जानराव ४) मिनषा अंबादास जानराव, सर्व रा. वडगांव (सि.), ता. उस्मानाबाद यांनी दि. १५.१०.२०२० रोजी १४.४५ वा. सु. नमूद शेतातील खोलीच्या दरवाजाचे कुलूप तोडून खोलीवर ‘श्री जानराव बंधु फॉर्म हाउस’ असे नाव टाकल्याचे मल्हारी ओमसे यांना दिसले. अशा मजकुराच्या मल्हारी ओमसे यांनी दि. १६.१०.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ४४७, ४६१, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोदवला आहे.

## “मारहाण.”

**पोलीस ठाणे, मुरुम:** डिगंबर सिद्राम डिग्गीकर, रा. आष्टाकासार, ता. लोहारा हे दि. १५.१०.२०२० रोजी २३.०० वा. सु. स्वत:च्या राहत्या घरी होते. यावेळी गावकरी- गंगाराम हनमंत डिग्गीकर व शिवाजी हनमंत डिग्गीकर या दोघा भावांनी डिगंबर यांच्या घरात घुसून, “तुम्ही आमच्या जागेत मुरुम का टाकला” असा जाबविचारून डिगंबर यांना शिवीगाळ, धक्काबुक्की करुन दगड फेकून मारला व घराची काच फोडून नुकसान केले तसेच ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या डिगंबर डिग्गीकर यांनी दि. १६.१०.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ४५२, ३३६, ३३७, ५०९, २९४, ४२७, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, बेंबळी:** सचिन भानुदास मस्के, रा. तोरंबा, ता. उस्मानाबाद यांना दि. १६.१०.२०२० रोजी ०२.०० वा. सु. घराबाहेर संशयास्पद आवाज आल्याने त्यांनी बाहेर येउन पाहिले असता भाऊबंद- राजेंद्र शामसुंदर मस्के हा हातात लोखंडी उलतने घेउन त्यांच्या अ‍ॅक्टीव्हा स्कुटरवर मारुन स्कुटरचे नुकसान करत असलेला आढळला. सचिन मस्के यांनी त्यास जाब विचारला असता राजेंद्र मस्के याने त्या उलतन्याने सचिन यांच्या हातावर मारुन त्यांना जखमी केले. अशा मजकुराच्या सचिन मस्के यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३२४, ३२३, ४२७ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

---

**जनसंपर्क विभाग, उस्मानाबाद पोलीस.**